# घोषणा

**दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर ) व न्यायदंडाधिकारी (प्रथम वर्ग) (मुख्य) परीक्षा-२०१४**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक १२ ऑक्टोबर, २०१४ रोजी घेण्यात आलेल्या दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर ) व न्यायदंडाधिकारी (प्रथम वर्ग) (मुख्य) परीक्षा-२०१४ चा निकाल दिनांक ४ एप्रिल, २०१५ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे. सदर निकालानुसार अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखती दिनांक ११ मे, २०१५ पासून आयोगाचे मुख्य कार्यालय, ८ वा मजला, कुपरेज टेलीफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई-४०००२१ येथे घेण्यात येणार असल्याबाबतची घोषणा आयोगाच्या वेबसाईटवर दि. १३ एप्रिल,२०१५ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. तथापि मुलाखतीच्या सदर कार्यक्रमात प्रशासकीय कारणास्तव बदल करण्यात येत असून प्रस्तुत मुलाखती दि. १२ मे, २०१५ ते २२ मे, २०१५ या कालावधीत वरील ठिकाणीच घेण्यात येतील. सदर बदलाची उमेदवारांनी कृपया नोंद घ्यावी. मुलाखतपत्र उमेदवारांना त्यांच्या Profile मध्ये उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच SMS व्दारेही कळविण्यात येईल.

दिनांक :१७ एप्रिल, २०१५
ठिकाण : मुंबई

विजया पडते
उपसचिव (परीक्षा),
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.